# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.09.2025** **वार- रविवार**

---

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

देशभरात उद्यापासून सुरू होत असलेल्या शक्तीच्या नवरात्री उत्सवाला, वस्तू आणि सेवा करच्या कपातीतून आणखी उत्साह मिळणार आहे. नागरिकांनी स्वदेशीचा पुरस्कार करत, आत्मनिर्भर भारताला हातभार लावण्याचा निश्चय केला पाहिजे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. थोड्याच वेळापूर्वी त्यांनी आकाशवाणी आणि दूरदर्शन वरून राष्ट्राला संबोधित केलं. या कर कपातीचा फायदा गरीब जनतेसह मध्यम वर्ग आणि सूक्ष्म तसंच लघु उद्योगांना होईल असंही ते म्हणाले.

**ई-पीक पाहणी**

राज्यात खरीप हंगामात लागवडी खालील क्षेत्रात दुरुस्ती करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला असून या हंगामात लागवड केलेल्या पिकांची नोंद ई-पीक पाहणीत करताना प्रत्येक जिल्ह्यातील पाच गुंठ्यांपेक्षा कमी क्षेत्र शेती क्षेत्रातून वगळण्यात येणार आहे. तसंच राज्यात अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांना अद्यापही नोंदणी करता आलेली नाही. ही मुदत आता 10 दिवसांनी वाढवून 30 सप्टेंबर अशी करण्यात आली आहे, अशी माहिती जमाबंदी आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे .

**पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद सुनावणी**

पुणे जिल्ह्यातील नगरपरिषद आणि तीन नगरपंचायतींच्या प्रभागरचनांच्या प्रारूप आराखड्यांवरील हरकती आणि सूचनांची सुनावणी पूर्ण झाली आहे. या अंतिम प्रभाग रचनेची प्रसिद्धी गॅझेटद्वारे 26 ते 30 सप्टेंबरदरम्यान होणार आहे.

**पुरस्कार**

गानवर्धन आणि तात्यासाहेब नातू फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या स्वरयोगिनी डॉ. प्रभा अत्रे शास्त्रीय संगीत पुरस्कार तालवादक पंडित रामदास पळसुले यांना ज्येष्ठ शास्त्रीय गायक डॉ. अजय पोहनकर आणि सुप्रसिद्ध लेखक, विचारवंत अच्युत गोडबोले यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला. सन्मानपत्र , 50 हजार रुपये, शाल अस पुरस्काराचे आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त विशेष सांगितीक मैफलीचे आयोजनही करण्यात आले होते.

**<u>नवरात्र महोत्सव</u>**

उद्यापासून सुरू होत असलेल्या शारदीय नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज बाजार पेठेत घट, फळे , फुले  खरेदी करिता गर्दी दिसून येत आहे. दरम्यान आज खडकवसला धरण परिसरात कपडे धुण्यासाठी गर्दी झाली असून प्रवाहात अडकलेल्या अनेक जणांची सुटका पोलीस आणि, अग्निशमन दलाच्या जवनांसह  स्थानिकांनी केली.

एकतीसाव्या पुणे नवरात्र महोत्सवाच उद्घाटन उद्या गणेश कला क्रीडा रंगमंच इथं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार असून या उद्घाटन सोहळ्यात समाजसेवक गिरीश प्रभुणे यांना महर्षी पुरस्काराने  सन्मानित करण्यात येणार आहे. या महोत्सवाचे सर्व कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असतील अस पुणे नवरात्रौ महोत्सवाचे आयोजक अध्यक्ष आबा बागुल यांनी सांगितले आहे .

**<u>लघुपट महोत्सव</u>**

जागतिक पर्यटन दिवसानिमित्त चौथ्या आंतरराष्ट्रीय पर्यटन लघुपट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या शनिवारी आणि रविवारी वरसगाव पानशेत येथे हा लघुपट महोत्सव होणार आहे. महोत्सवात 17 राज्य आणि दोन देशांतून 61 लघुपट, माहिती पटांपैकी 17 माहितीपट आणि लघुपटाचे स्क्रीनिंग होणार आहे.

पर्यटन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल यंदाचा जीवन गौरव पुरस्कार 2025 वीणा गोखले यांना , तर बेस्ट टूर्स अँड ट्रॅव्हल्स अवॉर्ड अमित कुलकर्णी यांना प्रदान करण्यात येणार आहे. यासह सर्वोत्कृष्ट लघुपट आणि सर्वोत्कृष्ट असे विविध पुरस्कार देण्यात येणार आहेत.

**<u>अटक</u>**

कोथरूड परिसरात दहशत पसरविण्यासाठी 18 सप्टेंबर गोळीबार करणाऱ्या पाच गुंडाना पोलिसांनी अटक केली असून, त्यांनी पुन्हा असा प्रकार करू नये यासाठी पोलिसांनी त्यांची याच परिसरात धिंड काढली.

**<u>बाजार</u>**

गुलटेकडी इथल्या पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. मागणी वाढल्याने भेंडी आणि घेवड्याच्या भावात वाढ झाली असून पालेभाज्यांमध्ये किंचित दरवाढ आवक झाली आहे. उद्यापासून सुरू होत असलेल्या शारदीय नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर फळ बाजारात मोठी उलाढाल झाली असून बहुतांश फळांची आवक वाढली असली तरी लिंबू आणि सीताफळांच्या भावात वाढ झाली आहे. फुल बाजारातही मोठ्या प्रमाणावर मागणी वाढली चांगल्या प्रतीच्या फुलांच्या भावात 20 टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे.

**क्रीडा**

नाशिक मध्ये सुरू असलेल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची विजयी घोडदौड कायम आहे. यामध्ये महिलांच्या गटात अकराव्या मानांकित प्रिथा वर्टिकर, पुरुषांच्या गटात जय पेंडसे आणि भार्गव चक्रदेव यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर मात करत चमकदार विजय नोंदवले.

पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने विविध गटाच्या जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा सुरू आहेत. स्पर्धेत काल सिद्धेश कुलकर्णी, सात्विक शर्मा, कविश भट्टड, भुवन कोन्नुर आणि सई पाटील या खेळाडूंनी आपापल्या गटात तीन गुणांसह आघाडी घेतली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश निरभ्र होतं, कमाल तापमान 30 तर किमान तापमान 21 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**